# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३७–२०१०/ दिनांक :

सौं. सिताबाई बापू बुधकर,
मु.पो. कोत्येंन बोबलाद, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सौं. सिताबाई बापू बुधकर, मु.पो. कोत्येंन बोबलाद,ता. जत, जि. सांगली यांनी वि.प.कडे शेतीपंप विद्युत पुरवठा मिळावा यासाठी वि.प.कडे दि. ३०.११.२००९ ला अर्ज केला व त्यासाठी भरावी लागणारी फी रु. ५०/–पोष्टाच्या मनीऑर्डरने पाठविली. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वितरण वाहिनीचा विस्तार असलेने अर्जदाराचा अर्ज प्राप्त झालेपासून १ महिन्याचे आंत वि.प.ने चलन देणे गरजेचे आहे. त्यानंतर तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ३०.११.२००९ रोजी दाखल केला.

अंतर्गत कक्षाने आदेश क्र. १०८४२ दि. ४.१२.२००९ नुसार भरपाईबाबत निर्देश केले आहेत की, जर कृती मानके साध्य करण्यात वितरण कंपनीला अपयश आल्यास तक्रारदारास भरपाई द्यावी लागेल. प्रस्तुतची तक्रार दिनांक ११.२.२०१० रोजी दाखल केली आहे. अर्ज दिलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष चलन मिळेपर्यंत झालेल्या विलंबाबाबत कृती मानकानुसार भरपाई मिळावी अशी तक्रारदाराने मागणी केली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे. वि.प.ने आपल्या दि. ३१.३.२०१० चा लेखी अहवालात तक्रारदाराचा अर्ज दि. १.१२.२००९ रोजी मिळाल्याचे मान्य केले आहे व त्यांस दि. ८.३.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे.

मंचासमोर तक्रारीची सुनावणी दि. ७.४.२०१० रोजी घेतली असता प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग हजर. वि.प.तर्फे लेखी म्हणणे दाखल केल्यानंतर तोंडी प्रतिपादन केले की, तक्रारदाराचा अर्ज दि. १.१२.२००९ ला प्राप्त झाला आहे व त्यांस दि. ८.३.२०१० ला चलन दिले आहे. विलंब झाल्याचे मान्य केले आहे. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी चलन दिनांक ८.३.२०१० ला दिल्याबाबत वि.प.तर्फे पुरावा, पोच हजर केलेली नाही असा आक्षेप घेतला.

उभयबाजूंचे कथनानुसार, खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार चलन मिळण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाई मिळण्यास हक्कदार आहे काय ?

उत्तर : होय

२) काय आदेश ?

उत्तर : खालील प्रमाणे.

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंचे कथनानुसार तक्रारदार यांनी शेतीपंपास विद्युत पुरवठा मिळावा यासाठी अर्ज केल्याचे स्पष्ट होते. तक्रारीच्या तारखेवरुन थोडासा वाद उत्पन्न झाला आहे, परंतु तक्रारदाराने दिलेली ३०.११.२००९ ही तारीख ग्राह्य धरावी लागेल, कारण वि.प.कडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख त्यांच्या आवक नोंदीतील उल्लेखाप्रमाणे मिळाल्याची आहे. कृती मानकातील तरतुदीनुसार १ महिन्याचे मुदतीत म्हणजे दि.२९.१२.२००९ पर्यंत तक्रारदारास चलन देणे आवश्यक होते, परंतु तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी चलन मुदतीत न देता ते दि. ८.३.२०१० ला देण्यात आले आहे असे सांगितले. प्रतिनिधीचा आक्षेप पुरावा, पोच नाही हा दूर्लक्षित केला तरी हे स्पष्ट होते की, दि. ३०.१२.२००९ ते ८.३.२०१० या कालावधीचा विलंब झाला आहे व तो १० आठवड्यांचा विलंब झाला आहे हे स्पष्ट होते. विलंबाबाबत वि.प.तर्फे कुठलेही स्पष्टीकरण नाही किंवा कलम ११.२ खाली एम.ई.आर.सी. कडून माफी बाबत कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे १० आठवड्यांच्या विलंबासाठी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. १०००/- नुकसान भरपाई तक्रारदारास देणेस वि.प. जबाबदार आहे व तक्रारदाराचा तो हक्क आहे. त्यामुळे वरील मुद्दा क्र. १ चे होय असे देवून खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे. वितरण कंपनीच्या कवठे महांकाळ विभागाकडून तक्रारदार यांस दिनांक ३०.१२.२००९ ते ८.३.२०१० या विलंबाच्या १० आठवड्याच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. १०००/- भरपाई द्यावी.

२) सदर रकमेचे दोन बिलींग सायकलमध्ये समायोजन करण्यात यावे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ३.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :